11 MAR 2026
पुढारी

# शिवाजी विद्यापीठ अधिसभेची आज बैठक

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ अधिसभेची (सिनेट) दि. ११ मार्च रोजी सकाळी ११ वा. राजर्षी शाहू सभागृहात बैठक होणार आहे. यात मागील अधिसभा कृती अहवाल, अंदाजपत्रकासह विविध विभागांचे अहवाल सादर केले जाणार आहेत. अधिसभा प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांची उपस्थिती असणार आहे. अधिसभेत कार्यवृत्तांत दुरुस्तीसाठी ठेवला जाणार आहे. मागील अधिसभेचा कृती अहवाल मंजुरीसाठी ठेवला जाईल. नंतर प्रश्नोत्तरांचा तास होईल. शैक्षणिक वर्ष २०२६-२७ चे अंदाजपत्रक सादर केले जाणार आहे. विद्यार्थी विकास मंडळ, क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ, विद्यार्थी तक्रार निवारण समितीचा अहवाल मंजुरीसाठी ठेवला जाईल. विद्यापीठाचा ६२ वा वार्षिक अहवालदेखील मांडला जाणार आहे. त्यानंतर ९ ते ७१ ठरावांवर चर्चा होऊन त्यास मंजुरी दिली जाईल.

जनसंपर्क कक्ष
11 MAR 2026 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठातर्फे उद्या संत तुकाराम व्याख्यानमाला

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ संत तुकाराम अध्यासनाच्या वतीने गुरुवारी (दि. १२) सायंकाळी ५.३० वाजता शाहू स्मारक भवन मिनी सभागृह येथे संत तुकाराम व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. संत तुकारामांचा मानवतावाद या विषयावर ह. भ. प. श्री. उल्हास पाटील (संगमनेर) प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे असून प्रा. नंदकुमार मोरे आणि प्रा. रणधीर शिंदे प्रमुख उपस्थित राहणार आहेत. विद्यार्थी, प्राध्यापक आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

11 MAR 2026

लोकमत

# शिक्षणशास्त्र विभागात महिला दिन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र विभागात संयुक्त राष्ट्र संघाने घोषित केल्यानुसार 'महिला आणि मुलींसाठी हक्क, न्याय आणि कृती' या विषयावर जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला.

विभागप्रमुख डॉ. चेतना सोनकांबळे यांनी, महिलांनी सक्षम, सुदृढ व आत्मनिर्भर असणे गरजेचे असल्याचे सांगितले. यावेळी येथील केआयटी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या माजी प्रा. डॉ. विदुला स्वामी प्रमुख उपस्थित होत्या. यावेळी विद्यार्थ्यांनी पोस्टर प्रदर्शन, कविता व चित्रफितीद्वारे महिलांचे विविध क्षेत्रांतील योगदान याविषयी सादरीकरण केले. यावेळी डॉ. रूपाली संकपाळ, डॉ. विद्यानंद खंडागळे, डॉ. सुप्रिया पाटील, डॉ. विजय सदामते, सरस्वती कांबळे, सारिका पाटील, कादंबरी खांडेकर, ऋतिका धनगर, साबिया बागवान, आनंद कुंभार, संगीता चंदनवाले, संजना भालकर, संगीता माने, अतुल जाधव उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
1 MAR 2026 शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
लोकमत

# शिवाजी विद्यापीठ अधिसभा आज

## वादळी होणार; अंदाजपत्रकासह ७१ ठरावांवर होणार चर्चा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाची अधिसभा (सिनेट) आज बुधवार, दि. ११ मार्चला सकाळी ११ वाजता राजर्षी शाहू सभागृहात होणार असून या बैठकीत विद्यापीठाच्या विविध महत्त्वाच्या विषयांवर वादळी चर्चा होणार आहे. विशेषतः शैक्षणिक वर्ष २०२६-२७ चे अंदाजपत्रक, विविध विभागांचे अहवाल आणि तब्बल ७१ ठरावांवर चर्चा होणार असल्याने अधिसभेकडे लक्ष लागले आहे.

अधिसभा प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडणार असून प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव आणि कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. बैठकीत सुरुवातीला अधिसभेच्या मागील कार्यवृत्तांत दुरुस्तीचा विषय मांडला जाणार असून त्यानंतर मागील अधिसभेचा कृती अहवाल मंजुरीसाठी ठेवला जाणार आहे. त्यानंतर प्रश्नोत्तरांचा तास होणार आहे. यावेळी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ चे अंदाजपत्रक सादर करण्यात येणार आहे. तसेच विद्यार्थी विकास मंडळ, क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ आणि विद्यार्थी तक्रार निवारण समितीचे अहवाल मंजुरीसाठी सादर केले जाणार आहेत. विद्यापीठाचा ६२ वा वार्षिक अहवालही अधिसभेत मांडला जाणार असून त्यानंतर ९ ते ७१ ठरावांवर चर्चा करून त्यास मंजुरी देण्यात येणार आहे.

### यापूर्वीच्या ठरावावरील अंमलबजावणी का नाही

दरवर्षी अंदाजपत्रक तसेच इतर विषयावरील ठरावांवर अधिसभेत चर्चा होते, मात्र त्यातील महत्वाच्या ठरावांवर अंमलबजावणी होत नाही असा आरोप सीए सारंग कोल्हापुरे, श्वेता परुळेकर आदी अधिसभा सदस्यांनी केला आहे. शिवाजी विद्यापीठाचा विद्यार्थ्यांकडून घेतलेल्या निधीतून साठलेल्या विद्यापीठ निधीतून कर्मचाऱ्यांकडून भरल्या न गेलेल्या इन्कम टॅक्ससाठीचा ५७ हजार रुपयांचा दंड भरण्यात आल्याचा आरोप परुळेकर यांनी केला आहे. ही रक्कम विद्यार्थ्यांसाठीच वापरली जावी.

11 MAR 2026

पुण्यनगरी

# शिक्षणशास्त्र अधिविभागात महिला दिन साजरा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र अधिविभागात संयुक्त राष्ट्रसंघाने घोषित केल्यानुसार 'महिला आणि मुलींसाठी हक्क, न्याय आणि कृती' या विषयावर जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. अधिविभागप्रमुख डॉ. चेतना सोनकांबळे यांनी यावेळी मार्गदर्शन केले. यावेळी येथील केआयटी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या माजी प्राध्यापक डॉ. विदुला स्वामी प्रमुख उपस्थित होत्या. यावेळी विद्यार्थ्यांनी पोस्टर प्रदर्शन, कविता व चित्रफितीद्वारे महिलांचे विविध क्षेत्रांतील योगदान याविषयी सादरीकरण केले. महिला दिनाचे औचित्य साधून विभागातील प्राध्यापक, शिक्षक, संशोधक व कर्मचारी यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास डॉ. रूपाली संकपाळ, डॉ. विद्यानंद खंडागळे, डॉ. सुप्रिया पाटील, डॉ. विजय सदामते, सरस्वती कांबळे, सारिका पाटील, कादंबरी खांडेकर, ऋतिका धनगर, साबिया बागवान, आनंद कुंभार, संगीता चंदनवाले, संजना भालकर, संगीता माने, अतुल जाधव उपस्थित होते. राजनंदिनी व रुचिता थरोळी यांनी सूत्रसंचालन केले, तर प्रतीक्षा पाटील यांनी आभार मानले.